॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

एप्रिल २०२४

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

## शालिवाहन शके १९४६, क्रोधीनाम संवत्सर प्रारंभ

## सुरुवात नव वर्षाची, नव संकल्पाची, उत्तुंग ध्येयाची.

चैत्राची पालवी, आनंदाला उधाण ।
अंगणी गुढी, दाराला तोरण ।।
आंब्याच्या डहाळी, कोकिळ कूजन ।
ब्राह्म मुहूर्ती, देवाचे पूजन ।।

संकल्प, नव वर्षाचा करूया ।
माणुसकीचे अद्वैत, अनुभवूया ।।
तन मन धन, अर्पूनी ।
सेवा मातृभूची, करूया ।।



नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा

# शाखा विभाग

◆ केंद्रीय स्तर इतिहास भूगोल प्रश्नमंजुषा स्पर्धा – १० मार्च रोजी वर्धकांना इतिहास आणि भूगोल या विषयाबद्दल जिज्ञासा तयार व्हावी आणि स्पर्धात्मक स्वरूप देऊन वर्धकांना या दोन्ही विषयांबद्दल आवड निर्माण व्हावी या हेतूने इतिहास व भूगोल या दोन विषयांची केंद्रीय स्तरावर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. इ. ५ वी, ६ वीची स्पर्धा वर्धिनीत तर इ. ८ वी आणि ९ वी स्पर्धा आगरकर शाळेमध्ये घेण्यात आली. याच दिवशी छोट्याशा समारंभामध्ये सुरेश पवार दादाच्या हस्ते बक्षीस वितरण झाले. जवळपास २०० वर्धकांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.

स्पर्धेच्या एक आठवडा आधी बैठक घेऊन त्यामध्ये व्यवस्था वाटप करण्यात आले. प्रश्नसंच तयार करणे, स्थळ ठरवणे, परवानगी काढणे, स्वच्छता करणे, वर्धकांना पूरक आहार देणे, सर्व शाखांना निरोप पाठवणे ही सर्व कामे युवकांनी अतिशय चोखपणे बजावली.

◆ पालक सभा – ● स्वामी ब्रम्हानंद शाखेत ९ मार्चला शाखाविभाग प्रमुख शुभम दादाने परीक्षा काळात पालकांची भूमिका, वार्षिक परीक्षेसाठी शाखेचे नियोजन, उन्हाळी सुट्यांमधील शाखेचे नियोजन (सहली, शिबीरे) इत्यादीची माहिती पालकांना सांगितली. ● समर्थ रामकृष्ण शाखेत १७ मार्चला अनौपचारिक पद्धतीने रांगोळी स्पर्धेसाठी पालक गटाचे एकत्रीकरण झाले. ● स्वामी अखंडानंद शाखेत २७ मार्चला सतीश बिराजदार दादाने वर्धकाची शैक्षणिक स्थिती, शाखेतील वार्षिक पेपरचा आढावा आणि आगामी नियोजन याची माहिती पालकसभेत सांगितली.

◆ धर्मवीर शंभुराजे शाखेत ६ मार्चला **आदर्श शहर** स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये गटांना आपल्या स्वप्नातलं आदर्श शहर वसविण्यास सांगितले. सर्वांनी वही, पेन, पुस्तक, बाटली आदी वस्तूंनी कल्पकतेने शहर बनविले.

◆ स्वामी सुबोधानंद शाखेने महाशिवरात्री निमित्त जवळच्या पांचाळेश्वर मंदिराला भेट दिली आणि मंदिर स्थापत्याची माहिती मुलांना सांगितली.

◆ स्वामी दयानंद शाखेत ८ मार्चला शिवमहोत्सवानिमित्त वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. विविध काळातील जसे अश्मयुग, संत परंपरा अशा विषयांवर आधारित वेशभूषा वर्धकांनी साकारल्या.

◆ समर्थ रामकृष्ण शाखेत लेखन, पाठांतर, आकलन अशा कौशल्यावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली.

◆ स्वामी ब्रह्मानंद शाखा – अभ्यास कौशल्य सत्र – १) स्मरण कौशल्य सत्र – वक्ते – श्री. ओंकार बाणाईत – दि. ९ मार्चला सरांनी सत्राची सुरुवात विषयाला अनुसरून अशा बौद्धिक खेळाने केली. सरांनी मेंदू स्मरणाचे कार्य कसे करतो हे स्पष्ट करून स्मरणशक्तीसाठी आपली पंचज्ञानेंद्रिये कशी उपयोगी पडतात व अभ्यास करताना धड्यातील मुख्य मुद्द्यांचे टिपण कसे काढावे हे सांगितले.

२) अभ्यास नियोजन – वक्ते – श्री. सुरेश पवार – दि. १५ मार्चला झालेल्या सत्रात आपल्या दैनंदिन जीवनातील कामांचे वेळेचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे, आधी झालेल्या परीक्षांच्या अनुभवावरून (गुण व अभ्यास) सर्व विषयांच्या अभ्यासाचे नियोजन करावे हे सांगितले.







# युवा विभाग




**हरिश्चंद्रगड सहल** – दि. २९ ते ३१ मार्च २०२४ – २९ मार्चला सकाळी ११ वाजता वर्धिनीमध्ये १० वी तील वर्धकांचे एकत्रीकरण करून पुणे ते खिरेश्वरचा प्रवास सुरू झाला. ओझरच्या विघ्नहर गणपतीचे दर्शन घेऊन दुपारी ४ च्या सुमारास गडाच्या पायथ्याला पोहोचलो. अतिशय उत्साही वातावरणात गड सर केला. दुसऱ्या दिवशी पहाटे उपासनेनंतर ओंकार वडजेने हंबीरराव मोहितेंची गोष्ट प्रबोधनात सांगितली. मैदानात तीन गट करून दंड रिंग आणि ध्वजयुद्ध घेण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांचे विचार आणि कार्यपद्धती या विषयावर मार्गदर्शन झाले.

दुपारच्या सत्रात 'शाळेमधील चांगल्या-वाईट आठवणी' याविषयी गटचर्चा झाली. विश्रांती नंतर कोकणकड्याकडे प्रस्थान झाले. तिथे श्री. विलास कुलकर्णी यांनी किशाभाऊ, ज्ञापुंच्या आठवणी सांगितल्या. तिसऱ्या दिवशी उपासना, प्रबोधन होऊन गड उतरण्यास सुरुवात झाली. अनेक अनुभव, मैत्रीची नाती, वर्धिनीची नव्याने ओळख, निसर्गाचा सहवास ही शिदोरी घेऊन युवक परतले.









**ढाक बहिरी सहल** – (दि. २३ व २४ मार्च) पुण्याहून सकाळी अकरा वाजता १२ वी तील वर्धकांचा रेल्वेने मळवलीला जाण्यासाठी पद्य व भक्तीगीते म्हणत प्रवास सुरू झाला.

गडाच्या पायथ्याला पोचलो तेव्हा मनामध्ये खूप उत्सुकता होती. त्यामुळे लगेचच चढाई सुरू केली. गडावरच्या महादेवाच्या मंदिरात थोडा वेळ विश्रांती घेऊन संध्याकाळी मैदानावर मनसोक्त दंडरिंग खेळ झाला. खेळ संपल्यानंतर प्रार्थना झाली. २ दिवसाच्या या सहलीत अनेक बौद्धिक विषय खूप वेगळ्या पद्धतीने आमच्यासमोर मांडण्यात आले. मौनसंवाद सत्रात शाखा विकासासाठी काय काय करता येईल यावर चिंतन केले. स्वतःशीच संवाद साधण्याचा हा अनुभव वेगळाच होता. आम्हा सर्व युवकांकडून 'पूर्व पुण्याईची शाळा' हा श्री. रामभाऊंचा लेख वाचून घेतला आणि त्यावर चर्चासत्र देखील झाले.

# उत्थान विभाग





◆ मासिक प्रशिक्षण – दि. ३ मार्चला झालेल्या अभ्यासिका प्रमुखांच्या प्रशिक्षणात सईताई बापट यांनी 'गोल सेटिंग' या विषयावर सत्र घेतले.

◆ सांस्कृतिक कार्यक्रम – दि. ९ मार्चला कसबा विभागातील विविध अभ्यासिकांतील मुलांच्या शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेकानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण मंडळ अधिकारी श्रीमती शुभांगीताई चव्हाण, श्री. महेश पोहनेरकर उपस्थित होते. मुलांनी पोवाडे, भारुड, नृत्य, पाळणा यातून शिवरायांना मानवंदना दिली.

◆ किशोरी विकास एकत्रीकरण – सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मुलींनी महात्मा फुले वाडा येथे भेट देऊन ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल माहिती घेतली. सावित्रीबाई व ज्योतिबांच्या पुतळ्यांचे पूजन केले.







# स्पर्धा परीक्षा केंद्र

◆ शहीद दिन – सर्व क्रांतिकारकांच्या बलिदानाचे आदरपूर्वक स्मरण करून बार्टी संस्थेच्या एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी. विभागाचे प्रमुख श्री. सतीश पाटील सरांनी केंद्रातील व अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेतील पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तीनही टप्प्यात अभ्यासाचे नियोजन, मानसिक आरोग्य आणि वेळेचे नियोजन या विषयांवर मार्गदर्श झाले. ते म्हणाले, ''अभ्यासाबरोबर वाचन, मनन आणि चिंतन याला पण महत्त्व दिले पाहिजे. लेखी परीक्षांचा सराव आणि वेळोवेळी यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन यालाही महत्त्व आहे. क्रांतिकारकांच्या प्रेरणादायी बलिदानाला उत्तम आणि प्रभावी प्रशासनाचा कारभार ही खरी मानवंदना आहे.''

◆ कार्यशाळा – सामाजिक कार्यकर्ते श्री. बिंदू माधव खिरे, अध्यक्ष बिंदू क्वियर राइट्स फाउंडेशन यांनी 'मानवाधिकार आणि तृतीयपंथी क्वियर समाज' या विषयावर विद्यार्थ्यांची कार्यशाळा घेतली. गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या देशात एल.जी.बी.टी.क्यू. संबंधित कायद्यांमध्ये सकारात्मक बदल झालेले आहेत. शासकीय सेवेत काम करताना याची ओळख असणे आवश्यक आहे या हेतूने ही कार्यशाळा घेण्यात आली.

## पाकोळी बालवाडी

हे शैक्षणिक वर्ष संपताना मुलांच्यात झालेले बदल बघून शिक्षकांना आणि पालकांना समाधान वाटते. या महिन्यात शिवरात्र, होळी आणि शिवजयंती हे सण उत्साहात साजरे झाले. 'डोक्यावर चांदोबा आणि गंगा...' हे गाणं मधल्या गटांनी सादर केले तर भगवान शंकराच्या फोटोतील सर्व शस्त्रास्त्रांची नावे छोट्या गटातील मुलांनी सांगितली. मोठ्या गटात ताईंनी शिवरात्रीची कथा सांगितली. शिवजयंतीला शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून ताईंनी शिवरायांच्या लहानपणीच्या गोष्टी सांगितल्या. सर्व गटातील मार्च, एप्रिल, मे, या महिन्यातले वाढदिवस शिवजयंतीच्या दिवशी साजरे झाले. गटात झालेल्या 'जीवन व्यवहार' या विषयातील पाठाचा मुलांनी स्मरणीय आनंद घेतला.





- लिंबू सरबत करणे – छोट्या गटातील मुलांनी सर्वांसाठी सरबत बनवले आणि आता घरी जाऊन रोज मी स्वतः सरबत करणार असे प्रत्येक जण ताईला सांगत होता.
- स्वच्छता – खेळण्यातली छोटी तांबे पितळीची भांडी सर्वांनी स्वच्छ केली. स्वतःचे खाऊचे ताटही धुतले. वर्गातील छोटे नॅपकिन, कपडे धुताना साबण लावणे, ब्रशने घासणे, खळबळणे, पिळणे, वाळत घालणे याचा आनंद मधल्या गटातील मुलांनी घेतला. पाण्यात खेळताना स्वतंत्र पण एकत्रित कामात ही मुले रमली.





## बचत गट - महिला दिन कार्यक्रम



दि. ९ मार्चला पांडवनगर भागातील बचत गटांच्या एकत्रीकरणात पांडवनगर पोलिस चौकीतील महिला कॉन्स्टेबल शीतल लायगुडे व स्मिता थोरात यांनी 'महिला सुरक्षा' या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच १९ मार्चला वर्धिनी परिसरातील बचत गटांचे एकत्रीकरण झाले. वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन सरांनी 'बचत गटातून महिला संघटन' हा विषय मांडला. त्यांच्या हस्ते पाककला स्पर्धेतील बक्षीसांचे वितरण झाले.

व्याख्यान – दि. १५ मार्चला रुग्ण सहाय्यक वर्गातील विद्यार्थिनी, बालवाडी शिक्षिका व वर्धिनीतील महिला कार्यकर्त्यांसाठी 'ताण तणावांवर पुष्पौषधी' या विषयावर सौ. सरोज भडभडे यांचे मार्गदर्शन झाले. शरीर आणि मन यांच्या परस्पर संबंधातील प्रत्येक रोगात पुष्पौषधी मनाला आनंदी आणि सकारात्मक बनवतात. त्यासाठी त्याचा वापर अवश्य करा असे त्यांनी सांगितले.

## श्रद्धांजली

रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशनचे १६ वे अध्यक्ष **स्वामी स्मरणानंद** यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी महानिर्वाण झाले. त्यांची संस्थेच्या आध्यात्मिक प्रमुखाची भूमिका सर्वांच्या स्मरणात राहील.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. वर्धिनी परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली.**